**फौजदारी किरकोळ अर्ज अर्ज क्र १२६/२०१९ मधील**

**निशाणी ५ वरील अंतरीम पोटगीचा आदेश**

**(अनिता अमोल सदाफुले वि. अमोल शिवलिंग सदाफुले)**

१. सदरचा अर्ज अर्जदार क्र.१ व २ यांनी महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा अन्वये सामनेवाला क्र. १ कडुन अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे –

अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक २२/०५/२०११ रोजी झाला. अर्जदार क्र.१ ही लग्नानंतर सामनेवाला क्र.१ याचेकडे वाई येथे सासरी नांदणेस गेली. सन २०१२ मध्ये सामनेवाला यांनी अर्जदारावर चोरीचा आळ घेवून तिला शिवीगाळ व मारहाण केली. सामनेवाला अर्जदारास जेवण न देता घराबाहेर बसवून ठेवत असे. सामनेवाला अर्जदाराच्या वडीलांकडे पैशाची मागणी करीत असत. सामनेवाला यांनी अर्जदारास घरातून हाकलुन दिल्याने अर्जदार तिच्या मुला समवेत म्हणजेच अर्जदार क्र.२ समवेत माहेरी राहत आहे. अर्जदार क्र.१ स्वतःचा व मुलाचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. सामनेवाला क्र.१ वाहनचालक असुन त्याची बागायत शेती आहे. सामनेवाला क्र.१ याचा ट्रॅक्टरचा व्यवसाय आहे. सामनेवाला अर्जदार यांचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. त्यामुळे सामनेवाला याचेकडून अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा रक्कम रु.१०,०००/– अंतरिम पोटगीची रक्कम मिळावी अशी अर्जदाराने विनंती केली आहे.

३. सामनेवाला क्र.१ ने निशाणी १५ येथे म्हणणे दाखल केले आहे ते

<u>खालीलप्रमाणे –</u>

अर्जदार क्र.१ ही सामनेवाला क्र.१ ची पत्नी तर अर्जदार क्र.२ हा त्यांचा मुलगा असल्याचे सामनेवाला याने नाकारलेले नाही. अर्जदार क्र.१ चा स्वभाव भांडखोर व हट्टी आहे. अर्जदार सामनेवाला याच्या कुटूंबियांशी सतत वाद करत असे. अर्जदार नेहमी भांडण झाले की माहेरी पळुन जात असे. दिनांक ०५/०५/२०१८ रोजी अर्जदार सामनेवालाचा त्याग करुन कायमस्वरुपी माहेरी निघुन गेली आहे. अर्जदार व सामनेवाला यांना दुसरी मुलगी असुन ती सामनेवाला याचेकडे आहे. सामनेवाला याची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. याउलट अर्जदाराची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. अर्जदार शिवणाचा व्यवसाय करते. अर्जदाराच्या वडीलांचाही कपड्याचा व्यवसाय आहे. त्यामुळे अर्जदार सामनेवाला कडून अंतरिम पोटगीची रक्कम मिळण्यास पात्र नाहीत.

४. उभय पक्षांच्या कथनांवरुन खालील मुददे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या करणांकरीता मांडत आहे –

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार अंतरीम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | होय.<br>दरमहा र.रु. २,०००/– |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार. |

**<u>– का र ण मि मां सा –</u>**

५. दोन्ही बाजुंचा प्रदिर्घ युक्तीवाद ऐकला. कौटुंबिक हिंसाचार महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची

व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते त्या महिलेची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत मिळावी जेणेकरुन ती महिला कमीतकमी कायदेशीर लढाई करु शकेल या हेतुने केली आहे.

६. प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार क्र.१ व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह झाला असुन त्यांना अर्जदार क्र.२ व अन्य एक मुलगी असल्याबाबत कोणताही वाद उपस्थित झालेला नाही.

**मुददा क्र. १ व २ बाबत –**

७. अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना सर्व प्रथम अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते का हे पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, सामनेवाला यांनी तिच्यावर चोरीचा आरोप केला, तिला उपाशी ठेवले, माहेरी हाकलून दिले, शिवीगाळ केली अशा प्रकारे त्रास दिला आहे. याउलट, सामनेवाला यांनी असे कथन केले की, अर्जदार कोणतेही संयुक्तिक कारण नसताना माहेरी राहते. अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांवर केलेले आरोप प्रत्यारोप याबाबत दोन्ही पक्षकारांना पुराव्याची संधी दिल्याशिवाय सखोल भाष्य करणे अधिक योग्य ठरणार नाही. परंतु, अर्जदाराने अर्जात तिच्यावर केलेल्या हिंसाचाराबाबतच्या प्रत्येक घटना तारखेनिशी नमुद केल्या आहेत. अर्जदारास दोन मुले आहेत. अशा परिस्थितीत कोणतीही स्त्री कोणतेही संयुक्तीक कारण नसताना माहेरी राहणे संभाव्य वाटत नाही. प्रथमदर्शनी अर्जदार तिला होणा–या त्रासामुळे वेगळी राहत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदारावर कौटुंबिक

हिंसाचार होत होता हे प्रथमदर्शनी दिसुन येते.

८. अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देताना अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. तसेच अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन नसेल तर सामनेवला याची अर्जदाराला आर्थिक सहाय्य करण्याची परिस्थिती आहे किंवा नाही हे बघणे महत्त्वाचे ठरते.

९. अर्जदाराने तिच्या अर्जात ती सध्या कमावत असल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. सामनेवाला याच्या कथनानुसार अर्जदार शिलाईचा व्यवसाय करत असुन तिला दरमहा ४० ते ५० हजार रुपये मिळतात. सामनेवाला याने या कथनांपृष्ठ्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नसल्याने अर्जदार कमावती आहे ही बाब सिध्द होत नाही.

१०. अर्जदार कमावती नसल्यामुळे तिचा उदरनिर्वाह करण्यासाठी सामनेवाला क्र. १ याची जबाबदारी असल्याने सामनेवाला क्र. १ कमावता आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. अर्जदाराने तिच्या अर्जात सामनेवाला क्र. १ वाहनचालक असुन त्याची बागायत शेती व ट्रॅक्टरचा व्यवसाय असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराने गट नं.१९/३ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यावरुन सामनेवाला क्र.१ चे नावे काही क्षेत्र नमुद असल्याचे दिसते. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याच्याकडे उत्पन्नाचे काहीतरी साधन आहे हे सिध्द होते. सामनेवाला क्र.१ कडे उत्पन्नाचे साधन असल्याने अर्जदार क्र.१ ही पत्नी म्हणुन व अर्जदार क्र.२ हा मुलगा म्हणुन त्यांचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही सामनेवाला याचीच आहे.

११. सामनेवाला याचेवर असणारी त्याच्या मुलीची जबाबदारी लक्षात घेता सामनेवाला याने अर्जदार क्र.१ व २ यांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी दरमहा रक्कम रु. २,०००/– देणे योग्य ठरणार आहे. अन्य बाबी या पुराव्या संदर्भात असल्याने त्यावर अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना भाष्य न करणे उचित ठरते. म्हणुन मी मुददा क्र. १ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवुन मुददा क्र. २ च्या उत्तरात खालील आदेश पारीत करते

**– आ दे श –**

१. अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा रक्कम रु. २,०००/– ( रु.दोन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन द्यावेत.

३. अर्जदाराने पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा.

४. अर्ज निकाली होण्यास अर्जदारामुळे विलंब होत असल्याचे दिसुन आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

६. आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना मोफत देण्यात यावी.

स्वाक्षरी/-

**( पी.आर.सबनीस )**

दि. २३/१२/२०२१ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कडेगांव